# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः29.03.2025** **वारःशनिवार**

---

1. 'देश प्रथम' हा भारताच्या परराष्ट्र धोरणाचा मंत्र-पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन
2. पंतप्रधांन नरेंद्र मोदी यांचा उद्या नागपूर दौरा
3. इलेक्ट्रॉनिक्स उपकरण उत्पादन योजनेला केंद्र सरकारची मंजुरी, केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात दोन टक्के वाढ
4. संरक्षण मंत्रालयाचा हिंदुस्थान एरोनॉटिक्स लिमिटेडसोबत 62 हजार 700 कोटी रुपयांचा करार
5. म्यानमा आणि थायलंडमध्ये झालेल्या भूकंपात आतापर्यंत 144 जणांचा मृत्यू आणि
6. आयपीएल क्रिकेट स्पर्धेत रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा चेन्नई सुपर किंग्जवर विजय

**<u>पंतप्रधान</u>**

'देश प्रथम' हा भारताच्या परराष्ट्र धोरणाचा मंत्र बनला असून, आता भारत केवळ जागतिक व्यवस्थेतच सहभागी होत नाही, तर भविष्य घडविण्यात आणि सुरक्षित करण्यातही हातभार लावत आहे, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केलं. ते काल नवी दिल्लीत एका खासगी दूरचित्रवाणी वाहीनीनं आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलत होते. सध्या संपूर्ण जगाचं भारताकडं लक्ष केंद्रित झालं असून गेल्या आठ वर्षात भारत जागतिक अर्थव्यवस्था क्रमवारीत अकराव्या स्थानावरून पाचव्या स्थानावर आल्याबद्दल पंतप्रधानांनी गौरवोद्गार काढले.

**<u>पंतप्रधान दौरा</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या महाराष्ट्राच्या दौऱ्यावर नागपूर इथं येत असून, गुढीपाडवा आणि हिंदू नववर्षानिमित्त होणाऱ्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यक्रमाचं औचित्य साधत, ते रेशीमबागेतल्या स्मृती मंदिर इथं संस्थापक डॉ केशव बळिराम हेडगेवार यांना आदरांजली वाहतील. तसंच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांच्या हजारो अनुयायांसह 1956 मध्ये बौद्ध धर्म स्वीकारला, त्या दीक्षाभूमीलाही ते भेट देऊन आदरांजली वाहणार आहेत. पंतप्रधानांच्या हस्ते नागपूरमध्ये माधव नेत्रालयाच्या विस्तार केंद्राची पायाभरणी होणार असून, त्यानंतर ते एका जाहीर सभेला संबोधित करणार आहेत. त्यानंतर पंतप्रधान नागपूरमधील सोलर डिफेन्स अँड एरोस्पेस लिमिटेड इथं युद्धपयोगी सामग्री चाचणी तळ आणि यूएव्हीसाठी धावपट्टी सुविधेचं उद्घाटन करतील.

**<u>केंद्रिय मंत्रीमंडळ</u>**

देशांतर्गत इलेक्ट्रॉनिक वस्तू उत्पादनाला चालना देण्यासाठी तसंच इलेक्ट्रॉनिक्स पुरवठा साखळी मजबूत करण्यासाठी केंद्र सरकारनं इलेक्ट्रॉनिक्स उपकरण उत्पादन योजनेला मंजूरी दिली आहे. माहिती आणि प्रसारण मंत्री

अश्विनी वैष्णव यांनी काल माध्यमांना केंद्रीय मंत्रीमंडळाच्या निर्णयांबाबत माहिती दिली. गेल्या दहा वर्षात इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्राचा वेगानं विकास झाला आहे. इलेक्ट्रॉनिक्सच्या निर्यातीतही या काळात एकंदर वार्षिक 20 टक्के वाढ झाल्याचं वैष्णव यावेळी म्हणाले. इलेक्ट्रॉनिक्स उपकरण उत्पादन योजनेसाठी 22 हजार कोटी रुपयांचा निधी देण्यात येणार असून यामुळे प्रत्यक्ष तसंच अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होतील असंही वैष्णव यांनी सांगितलं. केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांना दोन टक्के महागाई भत्ता आणि निवृत्त कर्मचाऱ्यांना दोन टक्के महागाई सवलत देण्याला काल मंत्रीमंडळानं अनुमती दिली. या वर्षाच्या एक जानेवारीपासून हा निर्णय लागू असेल. यंदाच्या खरीप हंगामासाठी फॉस्फेट आणि पोटॅश खतांसाठीच्या अनुदानालादेखील मंत्रीमंडळानं मंजुरी दिली आहे.

**<u>संरक्षण मंत्रालय</u>**

संरक्षण मंत्रालयानं हिंदुस्थान एरोनॉटिक्स लिमिटेडसोबत 156 हलकी लढाऊ हेलिकॉप्टर्स, प्रचंड आणि इतर संबंधित उपकरणांच्या पुरवठ्यासाठी आणि प्रशिक्षणासाठी 62 हजार 700 कोटी रुपयांचे दोन करार केले आहेत.या करारांमुळं सशस्त्र दलांची लढाऊ क्षमता वाढेल. हलकी लढाऊ हेलिकॉप्टर्स हे भारताचे पहिले संपूर्णपणे स्वदेशी बनावटीचं लढाऊ हेलिकॉप्टर आहे, त्याची क्षमता पाच हजार मीटरपेक्षा जास्त उंचीवर काम करण्याची आहे,असं संरक्षण मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<u>न्यायालय</u>**

सर्वोच्च न्यायालयानं 24 मार्च रोजी केलेल्या शिफारशींनंतर केंद्र सरकारनं न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांना दिल्ली उच्च न्यायालयातून अलाहाबाद उच्च न्यायालयात परत पाठवण्याची अधिसूचना जारी केली आहे. दरम्यान, न्यायमूर्ती वर्मा यांना कोणतंही काम देऊ नये,असे निर्देश सर्वोच्च न्यायालयानं अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींना दिले आहेत. वर्मा यांच्या सरकारी निवासस्थानाच्या आवारात बेकायदेशीर रोख रक्कम सापडल्याच्या आरोपांप्रकरणी सरन्यायाधीशांनी नेमलेल्या तीन न्यायाधीशांच्या समितीकडून त्यांची अंतर्गत चौकशी केली जात आहे.

**<u>रेस्टॉरंट्स</u>**

उपाहार गृह म्हणजेच रेस्टॉरंट्सना खाद्यपदार्थांच्या बिलांवर सक्तीचं सेवा शुल्क आकारता येणार नाही, असा निर्णय दिल्ली उच्च न्यायालयानं दिला आहे. यासंदर्भात केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधिकरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांना आव्हान देणारी फेडरेशन ऑफ हॉटेल्स अँड रेस्टॉरंट असोसिएशन ऑफ इंडिया आणि नॅशनल रेस्टॉरंट असोसिएशन ऑफ इंडिया यांची याचिका न्यायमूर्ती प्रतिभा एम. सिंह यांनी फेटाळून लावली आहे.

**<u>म्यानमा-थायलंड</u>**

म्यानमा आणि थायलंडमध्ये काल दुपारी झालेल्या 7 पूर्णांक 7 रिख्टर तीव्रतेच्या भूकंपात आतापर्यंत 144 जणांचा मृत्यू झाला असून सातशेहून अधिक जण जखमी झाले आहेत. या भूकंपामुळे मंडाले इथल्या ऐतिहासिक स्थळांचं नुकसान झाले असून सगेंग इथला 90 वर्षे जुना पूल कोसळला आहे. मृतांची आणि जखमींची संख्या वाढण्याची शक्यता असल्याचं म्यानमाच्या लष्करी सरकारच्या प्रमुखांनी सांगितलं. थायलंडमध्ये बँकॉक इथंही भूकंपामुळे तीन जणांचा मृत्यू झाला असून बांधकाम सुरू असलेली एक उंच इमारत कोसळली असून बँकॉकमध्ये 90 जण बेपत्ता आहेत, असं थायलंडचे संरक्षणमंत्री फुमथम वेचयाचाई यांनी सांगितलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्यानमा आणि थायलंडमध्ये झालेल्या भूकंपाबाबत चिंता व्यक्त केली असून भारत सर्वतोपरी मदत करण्यास तयार आहे, असं त्यांनी समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

दरम्यान भारतानं म्यानमारला सुमारे 15 टन मदत सामग्री पाठवली असून यामध्ये तंबू, चादरी, खाद्यपदार्थ आणि जनरेटर संच यासारख्या जीवनावश्यक वस्तु आणि महत्त्वाच्या वैद्यकीय सामुग्री पाठवण्यात आली आहे.

**भारतीय कैदी**

संयुक्त अरब अमिरातीनं रमजान निमित्त 500 भारतीय कैद्यांची सुटका केली आहे. भारत आणि आखाती देशांमधील सक्षम द्विपक्षीय संबंधांचं हे प्रतिबिंब असून केंद्र सरकारच्या सक्रिय आणि सातत्यपूर्ण राजनैतिक प्रयत्नांमुळं गेल्या दशकभरात विविध देशांमधील हजारो भारतीय नागरिकांची सुटका झाली आहे.

**मध्यप्रदेश-गहू**

मध्य प्रदेशात सरकार किमान आधारभूत किंमतीनं गहू खरेदी करत असून शेतकरीही आपला माल उत्साहानं विकत आहेत. यंदा आतापर्यंत 13 लाख 98 हजार शेतकऱ्यांनी हमीभावानं गहू विक्रीसाठी नोंदणी केली असून नोंदणीची शेवटची तारीख 31 मार्च आहे. मध्य प्रदेशात सुमारे 75 हजार शेतकऱ्यांकडून किमान आधारभूत किमतीने 5 लाख 80 हजार मेट्रिक टन गव्हाची खरेदी करण्यात आली आहे. खरेदी केलेल्या गव्हाचे पैसेही शेतकऱ्यांना नियमितपणे दिले जात असून आतापर्यंत 757 कोटींहून अधिक रक्कम शेतकऱ्यांना देण्यात आली आहे.मध्य प्रदेशात गव्हाची किमान आधारभूत किंमत 2425 रुपये प्रतिक्विंटल इतकी असून राज्य सरकार प्रतिक्विंटल 175 रुपये बोनस देत आहे. म्हणजेच 2600 रुपये प्रतिक्विंटल दराने गव्हाची खरेदी केली जात आहे.

**अमित शहा-बिहार**

केंद्रीय गृहमंत्री आणि भाजपचे ज्येष्ठ नेते अमित शहा आज दोन दिवसांच्या बिहार दौऱ्यावर जाणार आहेत. या दौऱ्यात ते गोपालगंज इथं जाहीर सभा आणि पाटणा इथल्या राज्यस्तरीय सहकार परिषदेसह अनेक कार्यक्रमांना उपस्थित राहणार आहेत. पाटणा इथं आज संध्याकाळी लोकसभा आणि राज्यसभेचे खासदार, आमदार, विधान परिषद सदस्य आणि इतर लोकप्रतिनिधींसह पक्षाच्या नेत्यांच्या बैठकीलाही ते उपस्थित राहणार आहेत.तर उद्या 800 कोटी रुपयांहून अधिक रकमेच्या विविध विकास प्रकल्पांचं लोकार्पण आणि पायाभरणीही अमित शहा यांच्या हस्ते होणार आहे.

**बुद्धीबळ**

महाराष्ट्र बुद्धीबळ संघटनेनं पुण्यात येत्या 13 ते 24 एप्रिल दरम्यान फिडे महिला ग्रांप्री बुद्धीबळ स्पर्धेच्या पाचव्या टप्प्याचं आयोजन केलं आहे. प्रतिष्ठेच्या कँडीडेट स्पर्धेसाठी या स्पर्धेतून पात्र ठरण्याची संधी असल्यामुळे या स्पर्धेला अत्यंत महत्त्व असल्याचं संघटनेचे अध्यक्ष डॉक्टर परिणय फुके यांनी सांगितलं. ग्रँड मास्टर कोनेरु हंपी, ग्रँड मास्टर हरिका द्रोणावल्ली आणि ग्रँड मास्टर वैशाली आर यांच्यासह चीन, रशिया, पोलंड, बल्गेरिया, मंगोलिया, जॉर्जिया देशांच्या बुद्धीबळपटू या स्पर्धेत सहभागी होणार आहेत. पुण्यातली आंतरराष्ट्रीय मास्टर दिव्या देशमुख वाईल्ड कार्डद्वारे या स्पर्धेत खेळणार आहे.

**क्रिकेट**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत रॉयल चॅलेंजर्स बेगळुरूनं काल रात्री चेन्नई सुपर किंग्जचा 50 धावांनी पराभव केला. विजयासाठी197 धावांचा पाठलाग करताना चेन्नई सुपर किंग्जनं निर्धारित 20 षटकांत 8 बाद 146 धावा केल्या. रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरुच्या रजत पाटीदारला 32 चेंडूत 51 धावांचं योगदान दिल्याबद्दल सामनावीर घोषित करण्यात आलं.

आयपीएल क्रिकेटमध्ये आज अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर गुजरात टायटन्स आणि मुंबई इंडियन्स यांच्यात सामना रंगणार आहे. हा सामना संध्याकाळी साडेसात वाजता सुरू होईल.

**<u>हवामान</u>**

पश्चिम बंगाल, सिक्कीम, गोवा आणि महाराष्ट्रात आज तुरळक ठिकाणी हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. अरुणाचल प्रदेश, आसाम आणि मेघालयमध्येही अशीच परिस्थिती राहण्याची शक्यता आहे. वायव्य भारतात आज तुरळक ठिकाणी जोरदार वारे वाहण्याची शक्यता असून, राजस्थानमध्ये धुळीचं वादळ येऊ शकतं. तसंच ओडिशाच्या अंतर्गत भागात उद्यापर्यंत उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे. तर येत्या दोन दिवसांत वायव्य मध्य भारतात कमाल तापमानात 2 ते 5 अंश सेल्सिअसनं घट होण्याची शक्यताही वेधशाळेनं वर्तवली आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.**